**श्री स.भु.शिक्षण संस्थेच्या औरंगपुरा परिसरातील सीटीएस क्र.४८९१ व ५१२१ येथील मोकळे भूखंड वाहन पार्किंगसाठी लीव्ह अँण्ड लायसेन्सवर देण्यासाठी निविदा संबंधी माहिती.**

---

१. औरंगपुरा परिसरातील संस्थेच्या मालकीचे व ताब्यातील भूखंड सीटीएस क्र.४८९१ (४०६६.३चौ.मी.) व सीटीएस क्र.५१२१ (९२८.७ चौ.मी.) दुचाकी/चारचाकी वाहनांच्या पार्कींगसाठी ११ महिन्यांच्या लीव्ह ॲण्ड लायसेन्स कराराने द्यावयाचे आहेत.

२. या भूखंडावर दुचाकी/चारचाकी वाहनांची पार्कींग करता येईल.

३. पार्कींगसाठी महानगरपालिकेची परवानगी कंत्राटदाराने प्राप्त करावी. त्यासाठी संस्था योग्य कागदपत्रावर स्वाक्षरी करील.

४. वाहनांची सर्वपरीने सुरक्षितता संबंधीची व विमा उतरविण्याची पूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

५. यासाठी लीव्ह ॲण्ड लायसेन्सचा करार अकरा महिन्याच्या कालावधीकरिता करण्यात येईल.

६. कंत्राटदाराने निविदा मंजूर झाल्यावर लीव्ह ॲण्ड लायसेन्सची रक्कम (१८% जीएसटीसह) एक आठवड्याच्या आत जमा करणे बंधनकारक राहील. ही रक्कम प्राप्त झाल्यावर लीव्ह अँण्ड लायसेन्सचा करार करून दिला जाईल.

७. निविदेसोबत प्रत्येक भूखंडासाठी रु.५०,०००/- इतकी रक्कम ईएमडी म्हणून डीमांड ड्राफ्टच्या स्वरूपात जमा करणे आवश्यक आहे. राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट 'सरस्वती भुवन शिक्षण संस्था' अशा नावाने असावा. अस्वीकृत निविदांचे ईएमडी परत करण्यात येतील. स्वीकृत निविदाधारकांनी त्यांची निविदा मंजूर होऊन देखील कराराची रक्कम भरून करारनामा करून न दिल्यास ई.एम.डी.जप्त करण्यात येईल.

८. पार्कींगसाठी वाहने लावल्यावर टोकन देणे, पार्कींग फी घेतल्यावर पावती देणे हे बंधनकारक असेल.

९. निविदेसोबत ओळखपत्र, नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी योग्य कागदपत्रे असावीत.

१०. सदर जागेचा वापर पार्कींग व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी करता येणार नाही किंवा सदर जागा कंत्राटदारांना इतरांना वापरण्यास देता येणार नाही.

११. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या वाहनाकरिता पार्कींगची व्यवस्था मोफत करण्यात यावी.

१२. वाहनतळावर पार्कींगसाठी जागा आखून देणे व त्यानुसार वाहने लावण्याची जबाबदारी कंत्राटदारांची राहील.

१३. कोणतीही निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क स.भु.शिक्षण संस्थेने राखून ठेवला आहे. निविदा स्वीकारण्याबाबत अथवा नाकारण्याबाबत कारणे देण्याचे बंधन स.भु.शिक्षण संस्थेवर राहणार नाही.

१४. संस्थेच्या कार्यक्रमासाठी किंवा प्रासंगिक कामानिमित्त वाहने लावण्यासाठी वाहनतळाची आवश्यकता भासल्यास संस्था कंत्राटदारास तसे कळवील व अशी व्यवस्था मोफत असेल.

१५. वाहनतळावर नेमावयाच्या कर्मचाऱ्यांची नेमणूक, वर्तणूक, त्यांचे वेतन / मानधन इत्यादीची सर्व जबाबदारी कंत्राटदारांची राहील. नियुक्त कर्मचाऱ्यांची माहिती संस्थेला कळवावी लागेल.

१६. या जागेवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही याची दक्षता कंत्राटदार घेतील.

मागील पानावर...

१७. वरील दोन्ही भूखंडापैकी कोणताही भूखंड संस्थेच्यावतीने एखाद्या कार्यक्रमास/प्रदर्शनास/विवाह सोहळ्यास किंवा इतर कार्यक्रमास देण्यात आल्यास या काळात संबंधित भूखंडावर तेवढ्या कालावधीसाठी वाहनतळ चालविता येणार नाही. अशा कार्यक्रमासाठी दिलेल्या जागेव्यतिरिक्त काही जागा उपलब्ध राहिल्यास ती जागा वाहनतळासाठी वापरता येऊ शकेल.

१८. को-या निवीदेची किंमत रु. १०००/- अधिक १८% जीएसटी इतकी राहील.

१९. संस्था कार्यालयातुन कोरी निवीदा कामकाजाचे दिवशी (सुट्टीचे दिवस वगळता) दि.०१/०५/२०२५ ते ०७/०५/२०२५ या कालावधीत दुपारी १२.३० ते ६.०० पर्यंत प्राप्त करावी.

२०. संपुर्ण भरलेली निविदा कागदपत्रांसह संस्था कार्यालयात सादर करण्याचा कालावधी कामकाजाचे दिवशी (सुट्टीचे दिवस वगळता) दि.०१/०५/२०२५ ते ०८/०५/२०२५ दुपारी ५.०० वाजेपर्यंत राहील.

***

C:\Users\HP\Downloads\Advertisment.docx